प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ०९.०२.२०२१**

**प्रस्तावित उरण उपजिल्हा रुग्णालयाच्या भूखंडाचे विलंब शुल्क सिडको भरणार**
**रुग्णालयाची लवकरात लवकर उभारणी व्हावी म्हणून घेतला निर्णय**

नवी मुंबई क्षेत्रातील रायगड जिल्ह्यातील उरण येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याकरिता जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड यांना सिडकोकडून सेक्टर-१५ए, द्रोणागिरी येथील ५९८३.७९ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड क्र. १ वाटपित करण्यात आला होता. सदर भूखंडाच्या विलंब शुल्कापोटी जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड यांना भराव्या लागणाऱ्या रु. ७,५१,०४६ विलंब शुल्काकरिता सिडकोकडून आर्थिक रुपाने योगदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रुग्णालयाची लवकरात लवकर उभारणी होऊन ते नागरिकांच्या सेवेसाठी सुरू व्हावे म्हणून सिडकोतर्फे रु. ७,५१,०४६ (रु.४,४५,३५६/- भाडेपट्टा अधिमूल्य आणि रु. ३,०५,६९०/- उर्वरित शुल्क) विलंब शुल्क भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

***"आरोग्य सेवेसारख्या मूलभूत सुविधांना सिडकोकडून नेहमीच प्राधान्य देण्यात आले आहे. सदर निर्णयामुळे उपजिल्हा रुग्णालयाची लवकरात लवकर उभारणी होऊन ते नागरिकांच्या सेवेकरिता दाखल होणे शक्य होणार आहे."***

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे २०१३ मध्ये उरण येथील ग्रामीण रुग्णालयाची १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याकरिता जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड यांचे भूखंड वाटपित करण्याची विनंती करण्याबाबतचे पत्र सिडकोला प्राप्त झाले. तद्नंतर सिडकोकडून २०१४ मध्ये सेक्टर-१५ए, द्रोणागिरी येथील ५९८३.७९ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड क्र. १ राखीव किंमत अधिक उर्वरित शुल्काच्या २५% ने सार्वजनिक आरोग्य विभागास वाटपित करण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड यांच्याकडून अनामत रक्कम रु. ८,४१,२०० आणि उर्वरित भाडेपट्टा अधिमूल्य रु. ७५,७२,६०० दोन समान हफ्त्यांत भरण्याकरिता सिडकोकडून पत्र पाठविण्यात आले. परंतु जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड यांचेकडून उर्वरित भाडेपट्टा अधिमूल्य हे विहित कालावधीत भरण्यात न आल्याने त्यावर रु. ७,५१,०४६ विलंब शुल्क लागू होत आहे. विलंब शुल्क भरले न गेल्याने भूखंडासाठीचा करारनामा अद्याप होऊ शकलेला नाही. परंतु रुग्णालयासारखी अत्यावश्यक

सुविधा लवकरात लवकर उभी राहणे आवश्यक आहे, हे विचारात घेऊन सिडकोने उपरोक्त विलंब शुल्क स्वत: भरण्याचा निर्णय घेतला आहे.

सिडकोच्या या निर्णयामुळे राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे प्रस्तावित असलेले १०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय लवकरात लवकर उभे राहून त्याचा उरण परिसरातील सर्वसामान्य नागरिकांना लाभ होणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**